# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक- रानिआ/मनपा-२०१७/प्र.क्र.२१/का.५
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग,मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १८ मार्च, २०१७

प्रति,
आयुक्त,
चंद्रपूर, परभणी, लातूर, भिवंडी-निजामपूर,
मालेगाव व पनवेल महानगरपालिका.

विषय :- ६ महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०१७
मतदार यादी तयार करण्यासाठी कार्यक्रम सुधारीत करण्याबाबत.
संदर्भ :- राज्य निवडणूक आयोगाचे समक्रमांकाचे दि. ०८/०३/२०१७ चे पत्र.

महोदय,

राज्य निवडणूक आयोगाच्या संदर्भांकीत दि. ८/३/२०१७ च्या पत्रान्वये चंद्रपूर, परभणी लातूर, भिवंडी-निजामपूर, मालेगाव व पनवेल या ६ महानगरपालिकांची मतदार यादी तयार करण्यासाठी कार्यक्रम देण्यात आलेला आहे. या कार्यक्रमानुसार प्रारुप मतदार यादीवर हरकती व सूचना दाखल करण्याचा कालावधी दि. १४/३/२०१७ ते १८/३/२०१७ असा आहे. तथापि, हरकती व सूचना दाखल करण्यासाठीचा कालावधी वाढवून देण्यात यावा, अशी मागणी लोकप्रतिनिधी तसेच नागरिकांकडून करण्यात येत आहे. सबब, संदर्भांकीत पत्रान्वये देण्यात आलेला कार्यक्रम हरकती व सूचना दाखल करण्याच्या टप्प्यापासून पुढीलप्रमाणे सुधारीत करण्यात येत आहे :-

| | | |
|---|---|---|
| i) | प्रारुप मतदार यादीवर हरकती व सूचना दाखल करण्याचा कालावधी | दि.१४/३/२०१७ ते २०/०३/२०१७ |
| ii) | प्रभागनिहाय अंतिम मतदार याद्या अधिप्रमाणित करुन प्रसिध्दीची सूचना देणे. | दि २४/०३/२०१७ |
| iii) | मतदान केंद्रांची यादी प्रसिध्द करणे. | दि. २२/०३/२०१७ |
| iv) | प्रभागनिहाय व मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिध्द करणे | दि. २५/०३/२०१७ |

दि. १९/०३/२०१७ रोजी सार्वजनिक सुट्टी असली तरी देखील हरकती व सूचना स्विकारण्यासाठी महानगरपालिकेची कार्यालये चालू ठेवण्यात यावीत. तसेच हरकती व सूचना दाखल करण्यासाठीचा कालावधी वाढवून देण्यात आलेला आहे यास व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी.

प्रारुप मतदार यादीवर दाखल करावयाच्या हरकती ट्रू व्होटर ॲपमधून दाखल करण्यास तांत्रिक अडचणी येत असल्यास पारंपारीक पध्दतीने हरकती व सूचना स्विकारण्यात याव्यात.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(नि. ज. वागळे)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत-
१) संगणकीकरण कक्ष, राज्य निवडणूक आयोग.
२) माहिती व जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग.
३) निवड नस्ती.